| MHRG100002492018 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **दाखल तारीख** | : | ३०/०७/२०२६ (२७/०२/२०१८) | | |
| | **नोंदणी तारीख** | : | ३०/०७/२०२६ (२७/०२/२०१८) | | |
| | **निकाल तारीख** | : | ३०/०७/२०२६ | | |
| | **कालावधी** | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०८ | ०५ | ०३ |

| **<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड, ता. महाड, जि. रायगड यांचे न्यायालयात</u>**<br><br>**(पिठासीन अधिकारी : श्रीमती पी. एस. माळी)** | |
|---|---|
| **नियमित फौजदारी खटला क्र. १०६/२०२६**<br>**(जुना संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११०/२०१८)**<br>**निशाणी क्र. ६०** | |
| अभियोग पक्ष,पोलीस ठाणे व गुन्हा रजिस्टर क्रमांक | महाराष्ट्र सरकारतर्फे महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, गुन्हा रजिस्टर क्रमांक ६६/२०१७ |
| अभियोगपक्षातर्फे वकील | श्री. डी. व्ही. गायकवाड, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपींचे नांव | १) अनिल बबन शिंदे,<br>वय – ४७ वर्षे, धंदा – चालक,<br>२) राकेश दत्तात्रेय शिंदे,<br>वय – ३३ वर्षे, धंदा – चालक,<br>३) शर्मिला अनिल शिंदे,<br>वय – ४० वर्षे, धंदा – गृहिणी,<br>४) अतिश अनिल शिंदे,<br>वय – २१ वर्षे, धंदा – शिक्षण,<br>५) अंकिता अनिल शिंदे,<br>वय – १९ वर्षे, धंदा – शिक्षण,<br>६) सुनंदा दत्ताराम शिंदे,<br>वय – ५० वर्षे, धंदा – घरीच,<br>७) रेश्मा राकेश शिंदे,<br>वय – २५ वर्षे, धंदा – गृहिणी,<br>सर्व रा. शिंदेकोंड कांबळे तर्फे महाड, ता. |

| | |
|---|---|
| | महाड, जि. रायगड |
| आरोपींतर्फे वकील | श्री. एस. एस. सर्कले |

## भाग 'ब'

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०५/११/२०१७ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ०६/११/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २७/०२/२०१८ |
| प्रतिकथन निश्चीत केल्याची तारीख | ३०/०५/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १८/०७/२०१९ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | ३०/०७/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | निरंक |

मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १४.०७.२०२२ रोजीच्या राजपत्राच्या
अधिसुचना क्र. ०८०१/२०२२ नुसार

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्या चा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनिल बबन शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ ची नोटीस | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | राकेश दत्तात्रेय शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ची नोटीस | | | | | |
| ३. | शर्मिला अनिल शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ ची नोटीस | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ४. | अतिश अनिल शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ ची नोटीस | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ५. | अंकिता अनिल शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ ची नोटीस | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ६. | सुनंदा दत्ताराम शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ ची नोटीस | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ७. | रेश्मा राकेश शिंदे | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)अ ची नोटीस | निरंक | भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग क
## साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| १. | साक्षीदार क्र.१ | श्री. विजय बबन शिंदे | २६ | फिर्यादी |
| २. | साक्षीदार क्र.२ | सौ. रंजना विजय शिंदे | २६ | साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –

| अनु. क्र. | साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| –– | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार असल्यास -

| अनु. क्र. | साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| –– | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

सरकारतर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयामार्फत दिल्या गेलेल्या निशाण्यांची यादी

अ. अभियोगपक्षातर्फे निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र –

| अनु. क्र. | कागदपत्र | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | फिर्याद जबाब | सहीपुरता निशाणी क्र. ४१ |

ब. बचाव पक्षातर्फे/आरोपींतर्फे निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र –

| अनु. क्र. | कागदपत्र | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| –– | निरंक | निरंक |

क. न्यायालयामार्फत निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र –

| अनु. क्र. | कागदपत्र | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | साक्षीदार क्र. २ यांचे आधारकार्डची पडताळीत प्रत | ३८ |

ड – भौतिक वस्तु

| अनु. क्र. | क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | एक बांबुची सुकलेली लाकडी काठी तिची लांबी ३ फुट १० इंच असुन तिचे एका टोका पांढऱ्या रंगाच्या सुतलीने बांधलेले |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

**<u>(दिनांक ३० माहे जुलै, सन २०२६ रोजी पारीत)</u>**

आरोपींविरुध्द निश्चित करण्यात आलेल्या 'भारतीय दंड संहितेचे' कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अथवा १४९ खालील दोषारोप सिध्दतेकरीता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

2. **<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :–**

घटना दिनांक ०५/११/२०१७ रोजी मौजे शिंदेकोंड तर्फे महाड गावच्या हद्दीत आरोपी याचे घराचे समोरील अंगणात घडलेली आहे. आरोपी व फिर्यादी विजय बबन शिंदे हे एकमेकांचे सख्खे नातेवाईक असुन आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व त्यांची पत्नी हे मुंबई येथे जाण्यास निघाले असता त्यांना भुसंपादन प्रक्रियेतुन मिळालेल्या पैशावरुन वाद घालुन भांडणे करुन फिर्यादी यांना शिवीगाळ व दमदाटी करुन त्यांना जमिनीवर खाली पाडुन आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी यांना शिवीगाळी करुन हाताबुक्क्याने मारहाण केली. सदर भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी यांची पत्नी साक्षीदार सौ. रंजना विजय शिंदे गेली असता आरोपी क्र. १ व २ यांनी त्यांनाही हाताबुक्क्यांनी मारहाण करुन आरोपी क्र. १ ते ७ यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी व साक्षीदार रंजना यांना मारहाण केली. तसेच आरोपी क्र. ७ याने फिर्यादी यांचे उजवे पायाचे पोटरीवर बांबुचे काठीने मुकामार केला. सबब, फिर्यादी यांनी आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

3. सदर फिर्यादीवरुन महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे यांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ६६/२०१७ 'भारतीय दंड संहितेचे' कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६ ,३४ नुसार गुन्हा नोंदवुन तपासीक अधिकारी श्री. एम. एन. म्हस्के, पोलीस उपनिरीक्षक, महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे यांनी तपास हाती घेतला. तपासादरम्यान त्यांनी आरोपींना अटक केली, घटनास्थळ पंचनामा केला व साक्षीदारांचे जबाब नोंदवुन

तपासाअंती आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

4. माझे मा. पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरुद्ध 'भारतीय दंड संहितेचे' कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ व १४९ नुसार प्रतिकथन निशाणी क्र. २६ निश्चित केलेला आहे. सदर प्रतिकथन निशाणी क्र. २६ आरोपींना त्याचे बोली भाषेत वाचुन दाखविला व समजावुन सांगण्यात आला. परंतु आरोपी यांनी बचावाचे साक्षीदार तपासले नाहीत. साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींच्या विरोधात जाणारा जो पुरावा आढळून आला त्याप्रमाणे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे जबाब निशाणी क्र. ४४ ते ५० अन्वये नोंदविण्यात आलेला आहे. सहाय्यक सरकारी वकील यांनी पुरावा संपल्याची पुरशिस निशाणी क्र. ४३ अन्वये दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदरचा निकाल होणेपुर्वी निदर्शनास आले आहे की, सदर प्रकरणामध्ये आरोपी क्र. ७ याने बांबुच्या काठीने फिर्यादीवर वार केल्याचे कथन आहे. तसेच तपासीक अधिकारी यांनी खटल्यामध्ये मुद्देमाल बांबुची काठी जप्त केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३२४ वाढविणेत आलेला आहे. त्यामुळे सदरचा खटला हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५९ प्रमाणे पुनःनोंदणी (Re-register) करणेकरीता निशाणी क्र. १ खाली आदेश पारीत केला आहे. त्यामुळे आरोपी यांचा पुन्हा एकदा दोषारोप निशाणी क्र. ५१ अधिक कलम ३२४ सह नोंदविणेत आला आहे. त्याचे निवेदन निशाणी क्र. ५२ ते ५८ त्यांचे बोली भाषेत वाचुन दाखविला व समजावुन सांगण्यात आला. परंतु त्यांनी गुन्हा नाकबुल केला आहे. सहाय्यक सरकारी वकील व आरोपी यांचे विद्वान वकील या दोघांतर्फे सदर वाढीव कलमाकरीता अधिक कलम वाढविल्याकामी अधिक पुरावा देणे नसल्याबाबत पुरशिस निशाणी क्र. ५९ दाखल करणेत आलेली आहे.

5. अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्री. डी. व्ही. गायकवाड व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एस. एस. सर्कले यांचा युक्तीवाद ऐकला.

6. अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व त्यावरील आरोपीचा बचाव यावरुन मी, खालील

मुद्दे माझ्या विचारासाठी घेतले आहेत आणि त्यावरील निष्कर्ष, मी त्याखाली दिलेल्या कारणांकरीता मांडीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ०५/११/२०१७ रोजी संध्याकाळी ६.३० वाजणेचे सुमारास मौजे शिंदेकोंड कांबळे तर्फे महाड गावच्या हद्दीत आरोपीच्या घराचे समोरील अंगणात आरोपी क्र. १ ते ७ यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याचा जमाव जमविला व सदर जमावाचे उद्देशपुर्वक सभासद झाले आणि त्याद्वारे आरोपी यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४३ सह कलम ३४ अथवा १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्या मंडळींच्या उद्देशपुर्तीसाठी दंगा केला आणि त्याद्वारे आरोपी यांनी भारतीय दंड संहितेचे कलम १४७ सह कलम ३४ अथवा १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्या मंडळींच्या उद्देशपुर्तीसाठी आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी विजय शिंदे व साक्षीदार रंजना शिंदे यांस हाताबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्याद्वारे आरोपी यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२३ सह कलम ३४ अथवा १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | नाही. |
| ४. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्या मंडळींच्या उद्देशपुर्तीसाठी आरोपी क्र. ७ याने फिर्यादीच्या उजवे पायाच्या पोटरीवर बांबुच्या काठीने मारुन दुखापत केली आणि त्याद्वारे आरोपी यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ अथवा १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | नाही. |
| ५. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्या मंडळींच्या उद्देशपुर्तीसाठी | |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करुन त्यांना जाणीवपुर्वक अपमानित केले व सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले आणि त्याद्वारे आरोपी यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ अथवा १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | नाही. |
| ६. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमवुन त्या मंडळींच्या उद्देशपुर्तीसाठी फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी केली आणि त्याद्वारे आरोपी यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ अथवा १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | नाही. |
| ७. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ६ बाबत :–**

(वरील सर्व मुद्दे एकाच घटनेशी निगडीत आहेत. पुरावा तसेच विवेचनाची पुनरावृत्ती टाळणेकरिता वरील मुद्यांची कारणमिमांसा मी एकत्रीतरित्या खालीलप्रमाणे देत आहे.)

7. अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्री. डी. व्ही. गायकवाड व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एस. एस. सर्कले यांचा युक्तीवाद ऐकला.

8. अभियोगपक्षातर्फे एकुण २ साक्षीदार तपासले आहेत. सदर प्रकरणातील साक्षीदार क्र. १ यांना निशाणी क्र. ३६ अन्वये साक्षीसमन्सची बजावणी झाली आहे. तसेच साक्षीदार क्र. २ यांनी स्वतःहुन साक्ष देणेकामी परवानगीचा अर्ज निशाणी क्र. ३७ अन्वये दिला असुन, साक्षीदार क्र. २ यांनी त्यांचे आधारकार्डची पडताळीत प्रत निशाणी क्र. ३८ अन्वये दाखल केले आहे.

9. समक्ष फिर्यादी व आरोपी यांनी एकत्रित निशाणी क्र. ४० अन्वये तडजोड अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज प्रस्तुत प्रकरणातील भारतीय दंड संहिताचे कलम १४३ नॉन-कंपाऊंडेबल असल्याकारणाने अर्ज फेटाळण्यात आला व सहाय्यक सरकारी

वकिलांना पुढे केस चालविण्याची संधी देण्यात आली. सहाय्यक सरकारी वकील यांना साक्षीदारांनी सहाय्य न केल्यामुळे साक्षीदार क्र. १ व २ यांना सुचक प्रश्न कोर्टाच्या परवानगीने विचारले. परंतु त्याचा काही एक उपयोग अभियोगपक्षाला झाला नाही. साक्षीदार क्र. १ यांनी फिर्याद जबाब यातील मजकुर नाकारला, परंतु सही स्वीकारली होती. त्यामुळे सहीपुरता निशाणी क्र. ४१ देणेत आला. सदर प्रकरणामध्ये आरोपी व फिर्यादी यांनी तडजोड पुरशिस निशाणी क्र. ४२ दाखल केलेली आहे. सहाय्यक सरकारी वकील यांनी पुरावा संपल्याची पुरशिस निशाणी क्र. ४३ अन्वये दाखल केलेली आहे.

10. सदर प्रकरणामध्ये आरोपी व फिर्यादी यांची कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे साक्षीदार क्र. १ यांनी त्यांचे शपथेवरील उलटतपासामध्ये सांगितले आहे. तसेच शेतजमिनीबाबत वाद झाला नव्हता, चर्चा झाली होती असे सरतपासामध्ये सांगितले आहे. फिर्यादी व साक्षीदार यांची आरोपींविरुद्ध तक्रार राहिलेली नाही. तसेच सर्व साक्षीदार यांनी त्यांचे सरतपासामध्ये सांगितले आहे की, त्यांच्यावर कोणाचाही दबाव, दडपण व अमीष नाही. जप्त मुद्देमाल बांबुची सुकलेली लाकडी काठी पुराव्याकामी कोर्टापुढे सादर केलेली नाही. पंचनामे शाबीत झालेले नाहीत. त्याचप्रमाणे फिर्यादी यांना मारहाणीची आरोपी यांनी धमकी दिली होती असा देखील पुरावा कोर्टापुढे कोणत्याच स्वरुपात आलेला नाही.

11. फिर्यादी व साक्षीदार यांनी मारहाणीच्या संदर्भात कोणतीही तक्रार दिलेली नाही हे त्यांच्या साक्षीमधुन देखील सिद्ध झालेले आहे. सदर प्रकरणामध्ये स्वतंत्र किंवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल साक्ष पुराव्याचे वेळी हजर केलेला नाही. सबब, मी या सर्व कारणांस्तव मुद्दे क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ७ करीता** :-

12. आरोपींवरील आरोप संशयापलीकडे जाऊन सिद्ध करण्याकरीता आरोपींविरुद्ध

कोणताही पुरावा न दिल्यामुळे, अभियोगपक्षाला आरोपींवरील आरोप सिद्ध करण्यात यश आले नाही, म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १) अनिल बबन शिंदे, आरोपी क्र. २) राकेश दत्तात्रेय शिंदे, आरोपी क्र. ३) शर्मिला अनिल शिंदे, आरोपी क्र. ४) अतिश अनिल शिंदे, आरोपी क्र. ५) अंकिता अनिल शिंदे, आरोपी क्र. ६) सुनंदा दत्ताराम शिंदे, आरोपी क्र. ७) रेश्मा राकेश शिंदे यांस 'भारतीय दंड संहितेचे' कलम १४३, १४७, ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अथवा १४९ खालील दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपी क्र. १ ते ७ यांचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक बांबुची सुकलेली लाकडी काठी तिची लांबी ३ फुट १० इंच असुन तिचे एका टोका पांढऱ्या रंगाच्या सुतलीने बांधलेले अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर कायद्यातील नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा. |
| ४. | आरोपी क्र. १ ते ७ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रूपये १०,०००/- प्रत्येकी वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला) | |

PUJA SANKET MALI
Digitally signed by PUJA SANKET MALI
Date: 2026.07.30 12:19:58 +0530

महाड,
दिनांक : ३०/०७/२०२६

(पी. एस. माळी)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, महाड.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | | Smt. P. B. Ringe |
| (b) | Presiding Officer | | Smt. P. S. Mali<br>Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C., Mahad. |
| (c) | Judgment /Order signed by P. O. on | | 30/07/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | | 30/07/2026 |